महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
Website-https://mahaawaas.com
दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४ / हेल्प लाईन क्र. १८०० २२ २०१९ Email ID-directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./कावि/राव्यकग्रागृ/सनियंत्रण व मुल्यमापन/२०२३/७८६ दिनांक - १३/०६/२०२३

**स्मरणपत्र-१**

प्रति,
प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व.

विषय : प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण मधील भूमिहीन लाभार्थ्यांची माहिती प्रमाणीत करून देणेबाबत.
संदर्भ : १) या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र.रा.व्य.क.ग्रागृ/सनियंत्रण व मुल्यमापन/६५३/२०२३, दि.३१ मे, २०२३.

उपरोक्त विषयान्वये, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील भूमिहीन लाभार्थ्यांची अद्ययावत माहिती राज्यशासन व केंद्र शासनास वारंवार द्यावी लागत असल्यामुळे सदर माहिती गुगल शीट वर अद्ययावत करून तसेच मा.कार्यकारी अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या स्वाक्षरीने प्रमाणीत करून या कार्यालयास दिनांक ०५ जून, २०२३ पर्यंत सादर करणेबाबत संदर्भ क्र.१ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, अद्याप माहिती या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. **मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन यांना अद्ययावत माहिती सादर करावयाची असल्या कारणास्तव** सदर माहिती व यादी प्रमाणीत करून या कार्यालयास सादर करावी ही विनंती.

सोबत - वरिलप्रमाणे

(नीलेश काळे)
**उपसंचालक**
**राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रत** :- १. मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.कार्यकारी अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व यांना माहितीस्तव.
३. मा.उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व यांना माहिती व कार्यवाहीस्तव.